**सं. फौजदारी खटला क्र. <u>११८०/२०२२</u>**
**गजानन विरूद्ध वैजनाथ**
**निशाणी १६ खाली**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ गजानन भिका शिंगणे याची उलटतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>आरोपी तर्फे ॲड श्री. एम. झेड. राठी यांचे मार्फत.</u>**

हे म्हणणे खरे नाही की, सहा. कृषी अधिकारी हे पद आमच्या खात्यात पुर्ण महाराष्ट्रात उपलब्ध नाही. मी सन २०१४ पासुन सेवेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२२ साली सहा. कृषी अधिकारी हे पद अस्तित्वात नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा निशाणी १६ वरील पुरवा वाचला नसुन त्यामध्ये खोटी माहिती पुरवली आहे.

२. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय कर्मचा—यांना उत्पन्न कर भरावा लागतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, माझे उत्पन्न सध्यातरी करपात्र नाही. हे म्हणणे खरे आहे की, उत्पन्न करपरतावा भरत असतांना त्यामध्ये आपल्याला मिळालेले पैसे व खर्च झालेले पैसे याबाबत तपशील नमुद करावा लागतो. माझे दैनंदिन आर्थिक व्यावहारांची मला माहिती आहे व आर्थिक व्यवहार कसे करावे लागतात याची देखील मला माहिती आहे. आरोपीला वादातील रक्कम रूपये ४,००,०००/— देतांना मी त्याचेकडुन कोणतीही वचन चिठ्ठी अथवा करारानामा लिहुन घेतलेला नाही. प्रस्तुत केस व्यतिरीक्त मी दाखल केलेली चलनक्षम पत्रकांचा कायदा कलम १३८ नुसार अन्य कोणतीही केस अकोट न्यायालयात प्रलंबित नाही. हे म्हणणे खरे नाही की, स्वाती हरीभाउ सोनोने व शिवाजी रामराव सुसर यांचे विरूध्द देखील मी चलनक्षम पत्रकांचा कायदा कलम १३८ नुसार अकोट न्यायालयात केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वाती हरीभाउ सोनोने व शिवाजी रामराव सुसर यांचेविरूध्द अकोट नयायालयात फौजदारी केस क्र. ४३७/२०२२ दि. २८/०९ रोजी दाखल केली आहे. सदरची केस भा. दं. वि. कलम ४२० नुसार अपराधासाठी दाखल केली आहे.

३. मी आरोपी वैजनाथ याला सन २०१४ पासुन ओळखतो. मी आरोपीसोबत प्रस्तुत व्यवहाराव्यतिरीक्त अनेकदा आर्थिक व्यवहार केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीसोबत केलेले व्यवहार हे अवैध सावकारीचे व्यवहार होते व मी आरोपीकडुन व्याज घेत होतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्येक व्यवहार माझे फोन पे खात्याद्वारे करत असतो. हे म्हणणे खरे आहे की, माझेकडे एस.बी.आय बॅकेचे फोन पे खाते आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. ३१/०७/२०२० रोजी मी आरोपीला माझे फोन पे खात्याव्दारे एकदा ५०,०००, एकदा २५,००० व एकदा ५,००० असे पैसे पाठवले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०१/०८/२०२० रोजी मी आरोपीला माझे

फोन पे खात्याव्दारे रू. २०,०००/— पाठवले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, दि. ३१/०७/२०२० व दि. ०१/०८/२०२० रोजी केलेल्या व्यवहाराच्या रकमा आरोपीने मला परत केल्या होत्या. दि. ३१/०७/२०२० व दि. ०१/०८/२०२० रोजी केलेल्या व्यवहारा व्यतिरीक्त इतर काही आर्थिक व्यवहार करण्याचे मला आरोपीसोबत काम पडले नाही किंवा कसे हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडुन दोन कोरे धनादेश सुरक्षेपोटी घेतलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने दिलेला एक धनादेश मी वटवण्याकामी लावला होता. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्याचे पैसे मला आरोपीने आणुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरूध्द मला मिळालेल्या धनादेशाचा गैरवापर करून खोटी केस केली आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, वादातील धनादेश निशाणी १९ यातील हस्ताक्षर माझे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात नमुद केल्याप्रमाणे माझे कुठलेही कार्यालय नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कधीही माझे कार्यालयात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला पाठवलेली निशाणी २१ वरील नोटीस ही त्याच्या सुयोग्य पत्त्यावर पाठवलेली नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, माझे उत्पन्न कर पात्र नसल्यामुळे माझी आरोपीला वाद पत्रात नमुद रकमेएवढी मोठी रक्कम देण्याची ऐपत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझेकडुन कधीही पैसे घेतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला माझेकडे मुलांच्या शिक्षणासाठी व कुटुंबाच्या औषधपाण्यासाठी कधीही पैसे मागण्याची गरज पडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत प्रकरणी संपुर्ण खोटी माहिती सांगितली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडुन जास्त रक्कम वसुल करण्यासाठी मी खोटी केस केली असुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**
(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. २८.०७.२०२५
अकोट

**SCC No. 1180/2022**
**Evidence/Exh. 16**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Evidence are same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 28/07/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 28/07/2025. |
| Evidence Uploaded on | : | 28/07/2025. |